जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

**प्रेसनोट क्रमांक - दिनांक - १४/०२/२०२५**

सायबर पोलीस स्टेशन पुणे शहर

**पुणे शहर पोलीसांनी सी.ई.आय.आर.पोर्टलच्या मदतीने लोकांचे गहाळ / हरविलेले ४५६ मोबाईल ट्रेस करुन त्यांना परत मिळवून दिल्याची धमाकेदार कार्यवाही केलेबाबत.**

पुणे शहर पोलीस आयुक्तालया मार्फत लोकांचे हरविलेले,पडून गहाळ झालेले मोबाईल फोनची तक्रारी करण्याकरीता पुणे शहर पोलीस वेबसाईटवर लॉस्ट ॲड फाऊंड हे पोर्टल उपलब्ध करुन देण्यात आले होते. जनतेकडून सदर पोर्टलवर बयाच मोबाईल हरविल्याच्या तक्रारी प्राप्त होतात. प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने नागरीकांना प्रॉपर्टी मिसींगचा दाखला ऑनलाईन मिळतो. हा ऑनलाईन दाखला व नागरीकांचे स्वतःचे आधारकार्ड याव्दारे सी.ई.आय.आर या केंद्रीय पोर्टलवर परत हरविलेल्या / गहाळ झालेल्या फोनबाबत तक्रार नागरीकांना नोंदवावी लागते. सी.ई.आय.आर पोर्टलवर प्राप्त तक्रारीनुसार हरविलेल्या मोबाईल फोनचे आय.एम.ई.आय. क्रमांकाचे तांत्रिक विश्लेषण करुन हरविलेल्या मोबाईल मध्ये सध्या सुरु असलेले सीमकार्डच्या मोबाइल क्रमांकाचा शोध घेते. सदरबाबतची सर्व माहिती ही पोलीसांना सी.ई.आय.आर. पोर्टलव्दारे प्राप्त होते. मोबाईल हरविल्यावर नागरीकांच्या मनात रुखरुख लागलेली असते.

पुणे शहर पोलीस दलातील गुन्हे शाखा, संगणक शाखा व सायबर पोलीस स्टेशन येथील अधिकारी व अंमलदार यांनी सी.ई.आय.आर. पोर्टल वरील प्राप्त ट्रेस झालेल्या मोबाईल करीता संयुक्त सहा टिम तयार करुन नमुद पोर्टलवरील माहितीचे तांत्रिक विश्लेषण करुन गेल्या महिन्याभरात केलेल्या कारवाई मध्ये पुणे शहरातील २३०० हरविलेल्या मोबाईलच्या तक्रारी मधील एकूण ४५६ मोबाईल फोन सापडले आहेत. यापुढे देखील पुणे शहराबाहेर ट्रेस झालेले मोबाईलचे शोधकार्य सातत्याने चालू रहाणार आहे.

दि.१४/०२/२०२५ रोजी हिरकणी हॉल, पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर, पुणे येथे मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे हस्ते हरविलेल्या मोबाईलच्या तक्रारीतील सापडलेले मोबाईल नागरीकांना परत देण्यात आले आहेत. ४५६ नागरीकांना हरविलेले मोबाईल परत मिळाल्याने त्यांनी आनंद व्यक्त करुन पोलीसांविषयी आदराची भावना व्यक्त केल्याने गेल्या महिनाभर मोबाईल शोध पथकाने केलेल्या अथक मेहतीचे चीज झाल्याचे समाधान मिळाले.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.अमितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त, श्री.रंजनकुमार शर्मा, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.शैलेश बलकवडे, मा.पोलीस उपआयुक्त, गुन्हे, श्री.निखील पिंगळे, मा.पोलीस उपआयुक्त,आर्थिक व सायबर गुन्हे,श्री.विवेक मासाळ, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे,पुणे शहर श्री.मच्छींद्र खाडे,यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सायबर पोलीस स्टेशन,श्रीमती स्वप्नाली शिंदे, टिम-१ राहूल शिंदे,किरण जमदाडे,संदिप कोळगे, टिम-२ प्रमोद टिळेकर, विशाल इथापे, मनोज सांगळे, टिम-३ चेतन चव्हाण,

नितीन जगदाळे, टिम-४ राजेंद्र पुनेकर,लटू सुर्यवंशी, समीर पिनाणे, टिम-५ इश्वर आंधळे, सुनयना मोरे, लोकेश्वरी चुटके, टिम-६ किरण गायकवाड, सचिन शिंदे, कल्याणी कोळेकर तसेच सुषमा तरंगे, दिनेश मरकड, अमर बनसोडे, आदनान शेख या सायबर पोलीस ठाणे, संगणक शाखा व गुन्हे शाखेकडील पोलीस पथकाने यशस्वी रित्या पार पाडली आहे.

या प्रेसनोट व्दारे सायबर पोलीस स्टेशन पुणे शहर हे जनतेस त्यांचे फोन हरविल्यास किंवा गहाळ झाल्यास तात्काळ सी.ई.आय.आर. पोर्टलवर माहिती भरण्यास आवाहन करीत आहे.








LOST YOUR MOBILE?

